**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः23.12.2024** **वारःसोमवार**

---

**ठळक बातम्या,**

१. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज दूरस्थ माध्यमातून देशभरातल्या 71 हजारांहून अधिक उमेदवारांना नियुक्तीपत्र प्रदान करणार

२. 70 व्या सवाई गंधर्व भीमसेन संगीत महोत्सवाची सांगता

३. राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीनं पुण्यात आयोजित पुणे पुस्तक महोत्सवाचा समारोप आणि

४. महिलांच्या मर्यादित षटकांच्या क्रिकेट सामन्यात भारताचा वेस्ट इंडिजवर दणदणीत विजय

**पंतप्रधान**

विविध सरकारी मंत्रालयं आणि विभागांमध्ये नोकरीसाठी निवड झालेल्या देशभरातल्या 71 हजारांहून अधिक उमेदवारांना पंतप्रधान नरेंद्र मोदी आज दूरस्थ माध्यमातून नियुक्तीपत्र प्रदान करणार आहेत. यावेळी ते उमेदवारांना मार्गदशनही करणार आहेत. देशभरात 45 ठिकाणी हा रोजगार मेळावा आयोजित केला जाणार आहे. देशभरातून निवडलेले नवे उमेदवार गृह मंत्रालय, टपाल कार्यालय, उच्च शिक्षण विभाग, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय, वित्तीय सेवा विभाग यांसारखी विविध मंत्रालये/विभागांमध्ये नियुक्त होतील.

**पंतप्रधान कुवेत**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना काल कुवेतच्या द ऑर्डर ऑफ मुबारक अल कबीर या सर्वोच्च पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. कुवेतचे आमीर शेख मेशल अल-अहमद अल-जबेर अल-सबाह यांनी त्यांना हा पुरस्कार प्रदान केला.

दरम्यान, मोदी यांनी कुवेतचे अमीर शेख मेशल अल-अहमद अल-जबेर अल-सबाह यांच्यासोबत औषधनिर्माण, माहिती-तंत्रज्ञान, फिन टेक, पायाभूत सुविधा आणि सुरक्षा अशा प्रमुख क्षेत्रातील द्विपक्षीय सहकार्याबाबत चर्चा केली.

**राज्य मंत्रीमंडळ**

विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या अखेरच्या दिवशी विस्तारित मंत्रिमंडळाचा शपथविधी आणि खातेवाटप झाल्यानंतर काल सगळे मंत्री आपापल्या जिल्ह्यात पोचले. या मंत्र्यांचं नागरिकांनी उत्स्फूर्त स्वागत केलं. त्यानंतर या मंत्र्यांनी महत्वाच्या योजना आणि कामं मार्गी लावण्याची ग्वाही दिली.

**आयआयएमसी नागपूर**

माहिती प्रसारण मंत्रालयाच्या अखत्यारितल्या आयआयएमसी या माध्यम क्षेत्रातल्या सर्वोच्च संस्थेची उभारणी बडनेरा इथं होत आहे. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव, संजय जाजू यांनी काल नागपूर इथं या संस्थेच्या बांधकामाचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी माहिती प्रसारण मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या आकाशवाणी, दूरदर्शन, पत्र सूचना कार्यालय, केंद्रीय संचार ब्युरो कार्यालयांच्या प्रमुखांचीदेखील बैठक घेतली.

**सवाई महोत्सव**

पुण्यात गेले पाच दिवस सुरू असलेल्या 70 व्या सवाई गंधर्व भीमसेन संगीत महोत्सवाची काल सुरेल सांगता झाली .ऐकूयात याविषयीचा  वृत्तांत

**यावर्षी महोत्सवाच्या पाच दिवसाच्या कालावधीत एकंदर 29 कलाकारांनी गायन, वादन आणि नृत्य अशा सर्वंकष संगीताची आनंदानुभूती रसिकांना दिली. जगप्रसिद्ध तबला वादक उस्ताद झाकीर हुसेन यांच निधन झाल्याची वार्ता अचानक कळल्यामुळे मंचावर येणारे प्रत्येक कलाकार**

**त्यांच्या आठवणीने भावूक होऊन संगीत सेवेद्वारे त्यांना आदरांजली अर्पण करत होते. कालच्या पाचव्या सत्राची सुरूवात दुपारी 12 वाजता संगीत मार्तंड पंडित जसराज यांचे शिष्य सुप्रसिद्ध गायक संजीव अभ्यंकर यांच्या प्रगल्भ गायनाने झाली. त्यांनी राग अहिरभैरवमध्ये शांत आलापीतून रागाची वातावरण निर्मिती उत्तम साधली. त्यानंतर कर्नाटक शैलीच्या सिहेंद्रमध्यम रागामध्ये शशांक सुब्रह्मण्यम यांच्या बासरीवादन आणि आर. कुमरेश यांच्या व्हायोलिन जुगलबंदीला रसिकांची भरभरून दाद मिळाली. किराणा घराण्याचे दिवंगत गायक पंडित फिरोज दस्तूर यांचे शिष्य पं. मिलिंद चित्ताळ यांच्या मधुवंती रागातील परिपक्व गायनालाही श्रोत्यांनी पसंती दिली. यावर्षीच्या महोत्सवाच आकर्षण ठरलेल्या संगीतकार अदनान सामी यांच्या यमन रागातील शास्त्रीय पियानो वादनाने रसिकांची मन जिंकली. त्यांच्या वादनाला ज्येष्ठ तबलावादक पं. अनिंदो चटर्जी यांनी अतिशय उठावदार साथ केली. त्यानंतर विख्यात भरतनाट्यम नृत्यांगना आणि अभिनेत्री शोभना यांचा नृत्यविष्कार हे अंतिम सत्राचे प्रमुख आकर्षण ठरले. डौलदार पदन्यास, समर्थ अभिनय आणि आकर्षक हस्तमुद्रा, यांचा मेळ जमवत त्यांनी विविध नृत्य रचना सादर केल्या. किराणा घराण्याच्या ज्येष्ठ गायिका स्वरयोगिनी डॉ. प्रभा अत्रे यांच्या शिष्या आरती ठाकूर कुंडलकर अश्विनी मोडक, चेतना पाठक अतींद्र सरवडीकर यांनी विविध राग गायनातून आपल्या गुरुंना अभिवादन केल, त्यांनी भैरवी रागातील प्रभाताईनी रचलेल्या जगत जननी या प्रसिद्ध रचनेच्या सहगायनातून अर्पण केलेल्या आदरांजलीने 70 व्या सवाई गंधर्व भीमसेन संगीत महोत्सवाची सुरेल सांगता झाली. आकाशवाणीच्या बातम्यासाठी, दीपा भंडारे ,पुणे**

**पुस्तक महोत्सव**

राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीने पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित पुणे पुस्तक महोत्सवाचा काल समारोप झाला. 14 ते 22 डिसेंबर या कालावधीत भरवण्यात आलेल्या या महोत्सवाला पुण्यासह राज्यभरातील पुस्तकप्रेमींनी भरभरून प्रतिसाद दिला. ऐकुया त्याबाबतचा हा वृत्तांत...

**वाचनसंस्कृतीला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशानं भरवलेल्या पुणे पुस्तक महोत्सवाला 10 लाखांपेक्षा अधिक नागरिकांनी भेट दिली, असं महोत्सवाचे मुख्य संयोजक राजेश पांडे यांनी सांगितलं आहे. या महोत्सवात लाखों पुस्तकांची खरेदी झाली, महोत्सवाला भेट देणाऱ्यांमध्ये लहान मुलं, शालेय विद्यार्थी आणि तरुणाईचा लक्षणीय सहभाग होता, महोत्सवाच्या अनुषंगानं बाल चित्रपट महोत्सव, मुलांसाठी कार्यशाळा, सांस्कृतिक कार्यक्रम या सारखे विविध उपक्रम घेण्यात आले; साहित्य रसिकांबरोबरच अनेक लेखकांनी महोत्सवाला भेट देत वाचकांशी उत्स्फूर्त संवाद साधला. लिटरेचर फेस्टिव्हल हे पुणे पुस्तक महोत्सवाचं यावर्षीचं वैशिष्ट्य होतं. ज्येष्ठ निवेदक हरिश भिमानी, शिव खेरा, मीरा बोरवणकर, यांच्यासह 50 पेक्षा अधिक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय किर्तीचे लेखक अभिनेते वक्ते तज्ञ मान्यवर यात सहभागी झाले होते. त्यांच्या कार्यक्रमांनाही रसिकांनी मोठी गर्दी केली. या महोत्सवात 4 विश्वविक्रम झाले. भारतीय संविधानाला 75 वर्षे पूर्ण होत असल्याने, संविधानाच्या मुखपृष्ठाचं शिल्प पुस्तकांच्या साहाय्याने तयार करण्यात आले. त्यासाठी 97 हजारांपेक्षा जास्त पुस्तकांचा वापर केला गेला. ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या उपस्थितीत महोत्सवाचा समारोप झाला. मराठी भाषा टिकवायची असेल तर ती ज्ञानभाषा व्हायला हवी. मराठी भाषा टिकवण्यासाठी मराठी शाळा टिकवणं आणि त्या उत्तम पद्धतीने चालवणं आवश्यक आहे असं मत माशेलकर यांनी यावेळी व्यक्त केलं. आकाशवाणी बातम्यांसाठी प्रसाद पाठक आणि शिवराज सणस यांच्यासह माधवी कुलकर्णी पुणे**

**बालरंगभूमी गौरव पुरस्कार**

पुण्यातल्या बालरंगभूमी संमेलनाचा काल समारोप झाला. या समारोप सोहोळ्यात बालरंगभूमीवरील उल्लेखनीय कर्याबद्दल प्रतिभा मतकरी यांना बालरंगभूमी गौरव पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. तीन दिवसांच्या या संमेलनात बालरंगभूमी परिषदेच्या पुण्यासह सातारा, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, अकोला, परभणी, नागपूर, धुळे, कल्याण, बीड, पिंपरी-चिंचवड, ठाणे इथल्या शाखांमधल्या बालकलावंत आणि दिव्यांग कलावंतांनी सादरीकरण केलं.

## साहित्य संमेलन

मराठी भाषा संवर्धन समिती, पुणे महानगरपालिका आणि पुण्यातली संवाद संस्था यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या राज्यस्तरीय शासकीय अधिकारी मराठी साहित्य संमेलनाचा समारोप काल झाला. या समारोप समारंभात पाच ठरावांना एकमुखी मान्यता देण्यात आली. मराठी बोलीभाषेतल्या नवनवीन शब्दांचा संग्रह वाढीस लागावा याकरता अभ्यास समिती नेमावी, शासकीय अधिकाऱ्यांच्या साहित्यकृतीला शासनातर्फे पुरस्कार दिले जावेत, सामान्यांना समजतील अशा सुलभ मराठी भाषेत शासन निर्णय, कायद्यांची माहिती दिली जावी, शासकीय अधिकारी मराठी साहित्य संमेलनाला राज्य शासनानं अनुदान द्यावं, असे ठराव यावेळी करण्यात आले. तीन दिवसांच्या या संमेलनात विविध विषयांवरील परिसंवाद आयोजित करण्यात आले होते.

## वाजपेयी वाळूशिल्प

माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त रत्नागिरीतल्या भाट्ये समुद्रकिनाऱ्यावर त्यांचं वाळूशिल्प साकारण्यात आलं आहे. आमदार रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते काल या शिल्पाचं अनावरण करण्यात आलं. रत्नागिरीतल्या मांडवी इथले कलाकार अमित पेडणेकर यांनी हे शिल्प साकारलं आहे.

## पत्रकारिता पुरस्कार

सत्यशोधक दीनमित्रकार मुकुंदराव पाटील यांच्या 139 व्या जयंती निमित्त अहिल्यानगर जिल्ह्यात तरवडी इथं राज्यस्तरीय पत्रकारिता साहित्य पुरस्कारांचं वितरण काल झालं. या कार्यक्रमात पुण्यातले पत्रकार राधेशाम जाधव यांना राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. नागपूरचे डॉ.अशोक काळे, अमरावतीचे डॉ.संदिप राऊत, मुंबईचे डॉ.श्रीधर पवार, नाशिकचे सुनिल शेलार, लातूरचे डॉ.गोविंद काळे, यांना साहित्य पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं.

**महिला क्रिकेट**

भारत आणि वेस्ट इंडिज महिला क्रिकेट संघांमध्ये काल वडोदरा इथं झालेला मर्यादित षटकांचा सामना भारतानं 211 धावांनी जिंकला. प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघानं 50 षटकांत 9 गडी बाद 314 धावा केल्या. स्मृती मानधनानं 102 चेंडूत 91 धावा केल्या.

पाहुण्या वेस्ट इंडिजचा संघ मात्र 27 व्या षटकांत अवघ्या 103 धावातच गारद झाला. रेणुका ठाकूर सिंगनं 10 षटकांत केवळ 29 धावा देत 5 फलंदाज बाद केले.

**हवामान**

राज्याच्या सर्वच भागांत किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत थोडी वाढ झाली आहे. आज राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**